

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▮ अंक ४९ ▮ बुधवार १८ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

न्यायालयाच्या आदेशाने १८४ ग्रॅम सोने फिर्यादीला परत

एमआयडीसी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या एका गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली तब्बल १८४ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मूळ मालकाला परत करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशान्वये पोलिसांनी ही कारवाई केली असून, आपला मौल्यवान ऐवज सुरक्षितपणे परत मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांचे आभार मानले आहेत. पोलिसांच्या या पारदर्शक आणि जलद कारवाईमुळे सर्वसामान्यांचा पोलीस दलावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. नागरिकांकडून एमआयडीसी पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) अन्वये एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. या



गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत १८ नोव्हेंबर २०२६ रोजी गुन्ह्यातील १८४ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त केली होती. या प्रकरणातील फिर्यादी चंद्रशेखर शिंदे यांना त्यांचा मुद्देमाल परत मिळावा, यासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार आज कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व सदर सोने शिंदे यांच्या स्वाधीन करण्यात आले.

या पथकाचा सहभाग

गुन्ह्याच्या यशस्वी तपासात व पुढील कार्यवाहीत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हेमंत थोरात तसेच सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, पोलीस अंमलदार राजेंद्र सुद्रिक, किशोर जाधव, शैलेश रोहोकले, बापूसाहेब फोलाने आणि नवनाथ दहिफळे या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

मोक्कातील फरार गुन्हेगारासह दरोड्याच्या तयारीतील टोळी एलसीबीकडून जेरबंद

कर्जतमधील राशीन–चिलवडी रोडवर सापळा रचून कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पुणे जिल्ह्यातील दौंड पोलिसांच्या रेकॉर्डबरील मोक्का गुन्ह्यात फरार असलेल्या एका अट्टल गुन्हेगारासह दरोड्याच्या तयारीत असलेल्या तीन जणांना जेरबंद करण्यात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. ही कारवाई कर्जत तालुक्यातील राशीन–चिलवडी रोडवर करण्यात आली असून, यातील तीन आरोपी पसार झाले आहेत. त्यांच्याकडून वाहने आणि घातक शस्त्रांसह सुमारे अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार एक विशेष पथक कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना दिनांक १७ नोव्हेंबर रोजी राशीन ते चिलवडी रोडने काही इसम दुचाकीवरून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी पिराच्या माळावर सापळा रचला. काही वेळाने तीन दुचाकींवरून येणाऱ्या संशयितांना पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र, पोलिसांना पाहताच ते दुचाकी टाकून पळू लागले. पोलिसांनी पाठलाग करून बाक्या बंड्या काळे (३९), गोट्या बंडू काळे (२५, दोघे रा. आखोणी, ता. कर्जत) आणि धोंड्या ईश्वर भोसले (२८, रा. बेलगाव, ता. कर्जत) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांनी आपल्या पळून गेलेल्या साथीदारांची नावे शुभम भोसले, रोहित चव्हाण आणि सुमित चव्हाण अशी सांगितली असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.



मोक्का गुन्ह्यातील अट्टल आरोपी गळाला

या कारवाईत जेरबंद करण्यात आलेला आरोपी धोंड्या ईश्वर भोसले (रा. बेलगाव, ता. कर्जत) हा सराईत गुन्हेगार आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात तो फरार होता. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात त्याच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मोक्का) कारवाई करण्यात आलेली आहे. अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणारा हा मोक्कातील फरार आरोपी अखेर अहिल्यानगर पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

कारवाई करणारे पथक

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, भीमराज खर्से, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, दीपक जाधव व जालिंदर साखरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

घटनास्थळावरून ३ दुचाकी, ३ मोबाईल, १ कटावणी, पान्हा, मिरची पूड, कोयता आणि स्क्रू ड्रायव्हर असा एकूण २ लाख ४१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोने–चांदीच्या दरात घसरगुंडी सुरूच

चांदीत गुंतवणूक करणाऱ्यांवर रडण्याची वेळ!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था – सोने व चांदीच्या दरात घसरगुंडी सुरू असून, जानेवारी २०२६ मध्ये सोने आणि चांदीचे दर उच्चांकावर पोहोचले होते. चांदीच्या दरवाढीमुळं अनेक जण मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत होते. २९ जानेवारीला मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीचा दर ४.२० लाख रुपये किलोवर पोहोचले होते. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धानंतर चांदीच्या दरात घसरण सुरु झाली. सध्या चांदीचा एका किलोचा दर १.६५ लाख रुपयांच्या खाली आले आहेत. म्हणजेच चांदीमध्ये ज्यांनी गुंतवणूक केली होती त्यांच्यावर रडण्याची वेळ आली आहे.



आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीचे दर घसरल्यानंतर रुपया मजबूत असल्यानं देशांतर्गत बाजारात चांदीचे दर कमी आहेत. अनिंद्य बॅनर्जी यांच्या मते एमसीएक्सवर चांदीच्या दराला १.६४ लाख रुपयांचा पहिला सपोर्ट असल्याचं म्हटलं होतं. १.६२ लाखांच्या खाली एक किलो चांदीचा दर गेल्यास आणखी चांदीचा दर १.५० लाख रुपये किलोच्या खाली जाऊ शकतो. चांदीचा दर वाढल्यास तो १.८० लाख रुपये किलोंपर्यंत जाऊ शकतो.

चांदीत अडीच लाखांपेक्षा अधिक रुपयांची घसरण

चांदीची औद्योगिक मागणी घटलेली नसताना आणि सोलर आणि एआय चिपमध्ये चांदीचा वापर वाढून देखील चांदीचे दर घसरत आहेत. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर जानेवारी महिन्यात चांदीचा दर ४.२० लाख रुपयांवरुन १ लाख ६३ हजार ८८९ रुपयांवर आला आहे. म्हणजेच चांदीचा दर २ लाख ५६ हजार १५९ रुपयांनी घसरला आहे. चांदीच्या दरांवर दोन गोष्टींचा परिणाम होत आहे. एकीकडे अमेरिकन डॉलर मजबूत होत आहे. दुसरीकडे अमेरिकन फेड रिझर्व्ह व्याज दरात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळं आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीचा दर ४६–४७ डॉलर प्रति औंसच्या जवळ पोहोचले आहेत. सोन्याच्या तुलनेत चांदीच्या दरांवर दबाव आहे. बाजार जाणकारांच्या मते डॉलर मजबूत झाल्यास चांदीच्या दरात आणखी घसरण होऊ शकते.

श्रीरामपूर व शेवगावमध्ये गुटखा विक्रेत्यांवर छापे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने श्रीरामपूर आणि शेवगाव तालुक्यात अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांवर तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून एकूण २५ हजार ६३ रुपयांचा अवैध गुटखा आणि मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे आणि त्यांच्या पथकातील अंमलदार राहुल डोके, भगवान थोरात, सुनील मालणकर, योगेश कर्डीले, रमीजराजा आत्तार, महादेव भांड, निळकंठ कारखेले, अभिजीत अरकल, भगवान सानप व किशोर शिरसाठ यांनी ही विशेष मोहीम राबवली.

दिनांक १७ नोव्हेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे पथकाने श्रीरामपूर शहर आणि शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत हे छापे टाकले. श्रीरामपूर शहरात टाकलेल्या पहिल्या छाप्यात वॉर्ड नं. २ मधील मतीन अली पठाण (वय ४१) याच्याकडून १८ हजार ७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्यावर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शेवगाव तालुक्यात दोन स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या. कऱ्हेटाकळी येथील रफिक अहमद शेख (वय २२) याच्याकडून ४ हजार ३४८ रुपयांचा, तर कांबी येथील प्रशांत दिगंबर राजपूत (वय ३२) याच्याकडून २ हजार ६४० रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला. या दोन्ही आरोपींवर शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वैचारिक लेख, साहित्यिक मेजवानी आणि विषयवैविध्याचा संगम!

'ज्ञानधारा'चा ८८ पानी दिवाळी विशेषांक वाचकांच्या भेटीला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळी म्हणजे केवळ रोषणाई, फराळ आणि आनंदोत्सव नव्हे, तर विचारांची देवाणघेवाण, साहित्याचा आस्वाद आणि नव्या संकल्पनांना उजाळा देणारा सांस्कृतिक सोहळाही आहे. याच भावनेतून 'ज्ञानधारा' साप्ताहिकाचा २०२६ चा ८८ पानी दिवाळी विशेषांक वाचकांच्या भेटीला आला आहे. साहित्यिक वैविध्य, सामाजिक भान, वैचारिक मांडणी आणि मनोरंजन यांचा सुरेख मिलाफ हे या अंकाचे वैशिष्ट्य ठरले आहे.



संपादक जयंत देशपांडे यांनी या विशेषांकाच्या माध्यमातून केवळ मनोरंजनात्मक साहित्याला प्राधान्य न देता समाजातील समकालीन प्रश्न, बदलती जीवनशैली, संस्कृती आणि नव्या पिढीसमोरील आव्हाने यांवर विचारमंथन घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे स्थानिक तसेच नवोदित लेखकांना लेखनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देताना साहित्यविश्वातील अनुभवी लेखकांचाही सहभाग या अंकात आहे.

या अंकात कथा, कविता, वैचारिक लेख, सामाजिक विषयांवरील भाष्य, पाककृती आणि व्यंगचित्रांचा समावेश आहे. याशिवाय यशाची बदलती संकल्पना, भारतीय संस्कृतीचे अंतरंग, कौटुंबिक आणि सामाजिक मूल्ये, बदलत्या शहराच्या चेहऱ्यामागील जुन्या आठवणी अशा विविध विषयांना स्पर्श करण्यात आला आहे.

उद्योगविश्वातील बदलांची दखल घेत पॅकेजिंग उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, लेबल प्रिंटिंग आणि बदलत्या बाजारपेठेतील संधी यांचाही वेध घेण्यात आला आहे. उद्योजकांचे अनुभव, महिलांचे कर्तृत्व आणि सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव हीदेखील अंकाची वैशिष्ट्ये आहेत.

विशेषांकात विनोदी व्यंगचित्रांची रंगत असून वाचकांसाठी पाककृतींची मेजवानीही आहे. अशोक कोठावळे, राजेश देशपांडे, राहुल देशपांडे, आयएएस अश्विनी भिडे, समाजसेविका अनुताई वाघ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

अवघ्या १०० रुपयांत उपलब्ध असलेला हा विशेषांक साहित्यप्रेमी, विचारवंत आणि सर्वसामान्य वाचकांसाठी वाचनानंदाची पर्वणी ठरणार आहे. जाहिरातदार, लेखक, कवी, तांत्रिक सहकारी आणि हितचिंतकांच्या सहकार्याने साकारलेल्या या दिवाळी विशेषांकातून 'ज्ञानधारा'ने वाचनसंस्कृती जपण्याबरोबरच नव्या विचारांना व्यासपीठ देण्याची आपली भूमिका अधोरेखित केली आहे.

गणेश–कार्तिकेय चरित्रातून ज्ञान, बुद्धी आणि कर्तव्यनिष्ठेची शिकवण – ह.भ.प. समाधान महाराज शर्मा

शिवमहापुराण कथा सप्ताहाचा पाचवा दिवस भक्तिमय वातावरणात संपन्न; बाप–लेकीच्या प्रेमाच्या प्रसंगाने भाविक झाले भावुक । व्यासपीठावर श्री गणेश व कार्तिकेय यांच्या आगमनावेळी नामाचा जयघोष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा पाचवा दिवस भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या वाणीतून गणेश व कार्तिकेय चरित्राचे निरूपण केले. कथेदरम्यान बाप आणि मुलीच्या प्रेमाचे महत्त्व सांगणाऱ्या भावनिक प्रसंगांनी उपस्थित भाविक भारावून गेले. अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि संपूर्ण परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले. कथेदरम्यान श्री गणेश व कार्तिकेय यांच्या व्यासपीठावरील आगमनावेळी भाविकांनी नामाचा जयघोष केला.



ह.भ.प. समाधान महाराज शर्मा म्हणाले की, सून म्हणून घरात आलेल्या मुलीमध्ये जोपर्यंत आई दिसत नाही, तोपर्यंत कुटुंबातील नात्यांचे खरे महत्त्व समजत नाही. आज वृद्धाश्रमांमध्ये आई–वडिलांना जावे लागते, याला कारण मुलगा आहे का, याचे आत्मपरीक्षण समाजातील प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. मुलगी ही घराची शान असून कुटुंबातील तिचे स्थान आणि महत्त्व प्रत्येकाने ओळखले पाहिजे.

बाप आणि मुलीच्या प्रेमाच्या नात्याचे महत्त्व सांगताना त्यांनी मांडलेल्या उदाहरणांमुळे संपूर्ण भाविकवर्ग भावुक झाला. या प्रसंगातून कुटुंबातील नात्यांची जपणूक, आई–वडिलांप्रती आदर आणि मुलींचे कुटुंबातील महत्त्व अधोरेखित झाले.

गणेश व कार्तिकेय चरित्रातून भक्तांना ज्ञान, बुद्धी, पराक्रम, कर्तव्यनिष्ठा आणि बंधुभाव यांची शिकवण मिळते. श्री गणेश हे बुद्धी, विवेक, शुभारंभ आणि विघ्नहर्ता यांचे प्रतीक आहेत, तर भगवान कार्तिकेय हे शौर्य, धैर्य, पराक्रम आणि नेतृत्वाचे प्रतीक मानले जातात. भगवान शंकर आणि माता पार्वती यांच्या दोन्ही पुत्रांच्या जीवनातील विविध प्रसंगांतून अनेक आध्यात्मिक संदेश मिळतात.

श्री गणेश यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रत्येक संकटावर मात केली, तर भगवान कार्तिकेय यांनी पराक्रम आणि ■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

शुक्रवारी कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांचे जनजागृतीपर व्याख्यान

अहिल्यानगर- राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पवित्र कर्मभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास २०२६ संपन्न होत आहे. याठिकाणी शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता कॅन्सर निदान व उपचार या वीषयी कॅन्सर जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील प्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ. भूषण संजय भळगट या व्याख्यानातून मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली. डॉ.भूषण भळगट जबडा, तोंड,थायरॉईड, स्तन, फुप्फुस,लहान व मोठे आतडे ,लिव्हर, किडनी, मुत्राशय, प्रोस्टेट, गर्भाशय, अंडाशय , त्वचेच्या गाठी ई.कॅन्सर संबंधित ऑपरेशन पुण्यातील रुबी हॉल, सह्याद्री, जहांगीर, के.ई.एम, मणिपाल,अपोलो, पुना हॉस्पिटल या नामांकित दवाखान्यात करतात. महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा सुरू असलेला समर्पण चातुर्मास शिखरावर पोहचला आहे. उपाध्यायश्रीजींच्या अनमोल मार्गदर्शनाचा लाभ भाविकांना मिळत आहे. जीवनाला दिशा देणारे आध्यात्मिक विचार सर्वांसाठी पर्वणी ठरत आहेत.याच अनुषंगाने याठिकाणी डॉ. भूषण भळगट यांच्या कॅन्सर विषयक जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.कॅन्सर हा आजार दुर्धर मानला जातो. परंतु योग्यवेळी निदान झाले तर चांगल्या उपचारांनी तो पूर्ण बराही होऊ शकतो. तसेच योग्य आहार विहार, सकारात्मक जीवनशैली ठेवल्यास कॅन्सरला प्रतिबंध केला जाऊ शकतो. कॅन्सर निदानाच्या आधुनिक पद्धती तसेच आधुनिक उपचार सुविधा आता उपलब्ध आहेत. याच संदर्भात डॉ. भळगट सविस्तर अनुभूती मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी उद्योगपती सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा परिवाराने केले आहे.

कल्पनेतलं घर, संस्कारांचं विश्व! इराबत्तीन परिवाराने साकारल्या पाच भातुकल्या

अहिल्यानगर - बालपणीच्या आठवणींना उजाळा देणारा आणि संस्कृतीचे संस्कार रुजविणारा भातुकलीचा खेळ आजही आपले वेगळेपण जपत आहे. तेलुगू भाषेत भातुकलीला 'बोम्मरिल्लू' (घरवंट) असे म्हटले जाते. दिवाळीच्या निमित्ताने दातरंगे मळा, एकदंत कॉलनी येथील इराबत्तीन परिवाराने दरवर्षीची परंपरा जपत यंदाही पाच आकर्षक भातुकल्या मांडल्या आहेत.या भातुकल्या साकारण्यासाठी परिवारातील भाऊ, वडील आणि मुलगा यांनी विशेष पुढाकार घेतला. छोटी भांडी, चूल, सजावट आणि बाहुल्यांच्या माध्यमातून कल्पनेतील घराचे सुंदर विश्व उभे करण्यात आले. विशेष म्हणजे, भातुकली हा केवळ मुलींचाच खेळ नसून मुलांनीही त्यात सहभागी व्हावे, हा समानतेचा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला. स्वयंपाक करणे, घराची स्वच्छता राखणे, सजावट करणे अथवा बागकाम करणे या गोष्टी केवळ महिलांची जबाबदारी नसून घरातील प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुलगा असो वा मुलगी, दोघांनाही घरातील कामांची ओळख व्हावी, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती निर्माण व्हावी आणि जबाबदारीची जाणीव व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.



वीर वडार एकता फाउंडेशनच्या बैठकीत समाज एकजुटीचा एल्गार!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वडार समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी, सामाजिक एकजुटीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी संघटनात्मक ताकद उभी करण्याच्या निर्धाराने वीर वडार एकता फाउंडेशनची महाराष्ट्र राज्यस्तरीय पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थापक अध्यक्ष विजय गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला. या बैठकीत समाजाच्या एकजुटीचा आणि संघटनात्मक ताकतीचे मुंबईत दर्शन घडले. या बैठकीत वडार समाजाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजातील तरुणांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, समाजातील कष्टकरी व वंचित घटकांना न्याय मिळवून देणे, शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील समाजबांधवांपर्यंत पोहोचवणे तसेच समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी शासनदरबारी संघटितपणे आवाज उठवणे, अशा विविध विषयांवर बैठकीत विचारमंथन झाले. संदिप कुसळकर यांच्यावर राज्यस्तरीय जबाबदारी या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयांपैकी एक म्हणजे समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्यरत असलेले संदिप अशोकराव कुसळकर यांची वीर वडार एकता फाउंडेशनच्या महाराष्ट्र राज्य कोर कमिटी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. समाजाच्या प्रश्नांबाबत असलेली तळमळ, संघटनात्मक कार्यातील सहभाग आणि समाजहितासाठी सातत्याने सुरू असलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. या नियुक्तीमुळे सोनईसह अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील वडार समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यस्तरावर समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी संदिप कुसळकर यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. याच बैठकीत गणपत पिट्टेवाड यांच्याकडे वीर वडार एकता फाउंडेशनच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.



दिवाळी फराळ व स्नेहमेळाव्यात खा. लंके यांचा सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– प्रा. शशिकांत गाडे यांच्या वतीने आयोजित दिवाळी फराळाच्या स्नेहमेळाव्यात अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल लोकनेते खासदार निलेश लंके यांचा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार, अर्जुन पुरस्कार प्राप्त कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्यासह राजकीय, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.याच कार्यक्रमात युवराज गाडे पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळाही उत्साहात पार पडला. सत्कार, स्नेह, शुभेच्छा आणि स्नेहभोजनाने हा सोहळा अविस्मरणीय ठरला!

डोळ्यांना प्रकाश नसला तरी मनातील आशेचा दिवा कधीच विझत नाही

अंध दिव्यांग बांधवांसाठी माणुसकीची दिवाळी; उद्योजक सनी संभाजी भोर यांच्या पुढाकारातून वस्त्र वाटप, किराणा किट, मिठाई व सर्वधर्मसमभावाचा प्रेरणादायी संदेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिवाळीच्या पावन पर्वानिमित्त अंध दिव्यांग बांधवांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश फुलविण्याच्या उद्देशाने अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर (काका) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे चिरंजीव उद्योजक सनी संभाजी भोर यांच्या विशेष पुढाकारातून समाजसेवेचा प्रेरणादायी उपक्रम अहिल्यानगर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात अंध व दिव्यांग बांधवांना किराणा किट, मिठाई आणि वस्त्रांचे वाटप करून दिवाळीचा आनंद त्यांच्यासोबत साजरा करण्यात आला.

या उपक्रमात रवींद्र वाघ व सौ.सीमा वाघ (रा. पिंपळगाव उजैनी) यांच्या वतीने किराणा किटचे वाटप करण्यात आले. तसेच उद्योजक सनी संभाजी भोर यांनी अंध व दिव्यांग बांधवांसाठी वस्त्रांचे वितरण करून दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या उपक्रमातून सर्वधर्मसमभाव, सामाजिक ऐक्य आणि माणुसकीचा सुंदर संदेश देण्यात आला.

कार्यक्रम अध्यक्ष संभाजी भोर (काका) यांच्या नेतृत्वाखाली तसेच उद्योजक सनी संभाजी भोर, गोरख दरंदले, राजेंद्र फळके, अनिल चाबुकस्वार, अप्पा फुफसे आणि गणेश जाधव यांच्या सहकार्याने उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित सर्व अंध व दिव्यांग बांधवांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना संभाजी भोर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या विचारांतून समाजात समानता, बंधुता, शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतेची प्रेरणा मिळते. या महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन सर्वधर्मसमभाव, परस्पर प्रेम, सामाजिक ऐक्य आणि गरजूंची निःस्वार्थ सेवा हीच खरी दिवाळी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उद्योजक सनी संभाजी भोर यांनीही समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करत, दिव्यांग व दृष्टिहीन बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे हेच आपल्या दिवाळीचे खरे समाधान असल्याचे सांगितले. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. रवींद्र वाघ व सौ. सीमा वाघ यांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजातील वंचित, दिव्यांग आणि दृष्टिहीन बांधवांच्या पाठीशी कायम उभे राहण्याचा संकल्प व्यक्त केला. स्टार लाईट दिव्यांग ट्रस्टच्या कार्यसंचालिका पल्लवी भालशंकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येकाने संवेदनशीलतेने पुढाकार घेणे आवश्यक आहे. सेवा, सहकार्य आणि आपुलकी या भावनेतूनच समाज अधिक सक्षम व समृद्ध होतो. दिवाळीसारख्या आनंदोत्सवात गरजू, दिव्यांग आणि दृष्टिहीन बांधवांसोबत आनंद वाटून घेणे हीच खरी मानवसेवा असून, समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी अशा सामाजिक उपक्रमांना अधिकाधिक पाठबळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. गोरख दरंदले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमासाठी लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल संचालक चंद्रकांत फुलारी व निता फुलारी यांचे त्यांनी विशेष आभार मानले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणारे सर्व दाते, मान्यवर, स्वयंसेवक आणि उपस्थित अंध-दिव्यांग बांधवांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी पत्रकार जहीर सय्यद, अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, उद्योजक सनी संभाजी भोर, राजेंद्र फळके, अनिल चाबुकस्वार, गोरख दरंदले, अप्पा फुफसे, गणेश जाधव, छाया धनवटे, मनीषा लोंढे, अनिता जाधव, दृष्टीसाथी मनेष वैराळ यांच्यासह अनेक अंध व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

नाट्य परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश कराळे यांची बिनविरोध निवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या उपाध्यक्षपदी पत्रकार, निवेदक, नाट्यसमीक्षक तथा रंगकर्मी अविनाश कराळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा शाखेची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली.

यावेळी सहकार्यवाहपदी नाना मोरे यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, उद्योजक तथा रंगकर्मी अमित गटणे, निवेदक उद्धव काळापहाड, सी.ए. राजेंद्र ऊर्फ ज्ञानेश्वर काळे, उद्योजक अशोक अकोलकर, रंगकर्मी तेजा पाठक, आर्टिस्ट किरण गवते, चित्रकार प्रशांत सूर्यवंशी आणि अभिजित दरेकर यांच्यासह सदस्यांची निवड करण्यात आली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे मुंबई येथील कोषाध्यक्ष सतीश लोटके, प्रमुख कार्यवाह सागर मेहेत्रे, कोषाध्यक्ष अनंत जोशी तसेच कार्यकारिणी सदस्य गणेश लिमकर उपस्थित होते.

बैठकीत संघटनात्मक बळकटी, नाट्यविषयक उपक्रम, नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यातील नाट्यचळवळीचा विस्तार याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शाखेच्या आगामी कार्याचा आराखडा आणि विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत सदस्यांनी आपली मते मांडली.

अहिल्यानगर जिल्हा शाखेचे रौप्यमहोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी उत्साहात साजरे करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या निमित्ताने जिल्हाभरात सांस्कृतिक, साहित्यिक आणि नाट्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये ज्येष्ठ रंगकर्मींचा गौरव, नाट्य कार्यशाळा, एकांकिका स्पर्धा, नाट्यसंमेलन तसेच विशेष नाट्यमहोत्सव आयोजित करण्याचे नियोजन आहे.

नवनिर्वाचित उपाध्यक्ष अविनाश कराळे यांनी मराठी रंगभूमीच्या विकासासाठी, नवोदित कलावंतांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि जिल्ह्यातील नाट्यचळवळ अधिक व्यापक करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जिल्ह्यातील कलाकार, नाट्यसंस्था आणि रसिकांना एकत्रित घेऊन नाट्य परिषदेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नाट्य, साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पैठण न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे माननीय उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान काम समान वेतन मिळण्यासाठी बेमुदत संप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– माननीय उच्च न्यायालयातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम (जिल्हा) न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही 'समान काम, समान वेतन' हे तत्त्व लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, पैठण येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी पासून बेमुदत संप पुकारला आहे.

या आंदोलनांतर्गत न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर असल्यामुळे कामकाजापासून दूर राहणार असून, शासनाचे लक्ष आपल्या प्रलंबित मागण्यांकडे वेधणार आहेत. महाराष्ट्रातील सुमारे ३४,००० न्यायालयीन कर्मचारी या आंदोलनात सहभागी झालेले आहेत.

मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान काम समान वेतन संदर्भात शासनाने जीआर काढला नाही तर या आंदोलनातून एकही कर्मचारी माघार घेणार नाही, असा इशारा औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना, पैठण तालुका अध्यक्ष श्री. एस. एम. वाघचौरे यांनी दिला. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, पैठण येथील अधीक्षक आर. एन. बुणगे, सहाय्यक अधीक्षक सी. जे. निकम, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पैठण येथील अधीक्षक विठ्ठल इंगे, सहाय्यक अधीक्षक अजय लचुरे, राजेंद्र पाटील, श्रीमती दिपाली हिसवणकर, लघुलेखक किशोर चौधरी, बळीराम जाधव, रामेश्वर पुरी, लिपिक विश्वास ठोंबरे, भारत इंदापुरे, सलीम देशमुख, संजय महाजन, सुनील पाटील, लक्ष्मीकांत बावगे, ज्ञानेश्वर ओळेकर, सतिश बोरुडे, दुर्गादास देशमुख, दीपक नाटकर, विजय सुरवसे, हनुमान धपाटे, प्रथमेश पाटील यांच्यासह इतर कर्मचारी, महिला कर्मचारी, बेलीफ व शिपाई वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या आंदोलनामुळे न्यायालयीन तसेच प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन कोणती भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य सरकार दुष्काळी परिस्थीती वर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणार – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेच्या प्रदेश पदाधिकारी व जिल्हाध्यक्षांची राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत राज्याचे कृषिमंत्री ना.दत्तामामा भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या मुंबई येथील सिद्धगड या निवासस्थानी मंगळवारी आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीला माजी आमदार लहू कानडे , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अविनाश आदिक , अनिल त्रिपाठी , किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर , प्रदेश उपाध्यक्ष अनिल देठे पाटील , सरचिटणीस डॉ.गणेश डोंगरे , डॉ.मंगेश देशमुख , डॉ.अभिजित घोरपडे आर्दीनी उपस्थित राहुन राज्यातील भिषण दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला.

या वेळी बोलताना राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की , राज्यात यावर्षी पडलेला दुष्काळ हा अत्यंत भिषण असुन , राज्यातील जनतेला या संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन दिर्घकालीन उपाययोजना करणार आहे.त्या अनुषंगाने



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय देखील घेण्यात आले असून , उपसमितीच्या बैठका देखील सुरू आहेत.नागरिकांना अन्नधान्य, पाणी व पशुधनाला लागणारा चारा पुरविण्यासाठी शासनस्तरावर जोरदारपणे प्रयत्न सुरू असुन , शेतकऱ्यांनी देखील या संकटाचा सामना करण्यासाठी सरकारला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. तसेच या दरम्यान राज्यातील विविध भागांमधुन आलेल्या किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या भागातील दुष्काळाची दाहकता कृषीमंत्री महोदयांना सांगितली माजी आमदार लहू कानडे यांनी देखील प्रशासकीय सेवेत असताना तत्कालीन काळामध्ये दुष्काळी परिस्थितीत केलेल्या कामाचा अनुभव स्पष्ट करत ग्रामीण भागातील सध्याच्या वास्तविकतेवर प्रकाश टाकला. किसान सभेचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल देठे पाटील यांनी देखील अहिल्या नगर जिल्हा व पारनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा देताना सांगितले की , शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी राज्य सरकारने पशुपालक शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर चारा घेण्यासाठी अनुदान द्यावे तसेच शेतकऱ्यांचे खरिप व रब्बी असे दोन्हीही हंगाम वाया गेलेले असल्याने शेतकऱ्यांना भरिव आर्थिक मदत करून या संकटातून बाहेर काढावे तसेच पशुखाद्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढत असुन ते देखील नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात असे आवाहन केले.

या वेळी विजया भोसले , सुदाम भोर , बबनराव तिडके , दिलीप खोडदे , प्रा.कैलास निमसे , रामदास देठे , संग्राम खोडदे , विनोद खोडदे तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे २० नोव्हेंबर रोजी एमएसएमआय कर्ज आऊट्रीच कार्यक्रमाचे आयोजन

अहिल्यानगर- व्यापाऱ्यांना व लघु-मध्यम



उद्योजकांना व्यवसाय वाढीसाठी सुलभ व जलद वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने अहिल्यानगर क्षेत्रात एमएसएमआय नॅशनलवाईड क्रेडिट आऊट्रीच अभियान २०२६अंतर्गत विशेष कर्ज आऊट्रीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम २० नोव्हेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी दुपारी ४.०० वाजता ॲमी हॉल एमआयडीसी, नागपूर अहिल्यानगर. तसेच नगर-पुणे रोड, ईस्पिरा हॉल सफलता सुपा एमआयडीसी, ता. पारनेर, जि.अहिल्यानगर. येथे होणार आहे . या कॅम्पमध्ये उद्योजकांना आकर्षक व्याजदर व्यवसायाच्या वाढीसाठी स्पर्धात्मक व आकर्षक व्याजदरासह तातडीच्या व्यावसायिक गरजांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध असणार आहे . यामुळे उद्योगातील खर्च कमी करून अधिकाधिक बचत करण्याची संधी मिळणार आहे अशी माहिती क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे यांनी दिली .कॅम्पमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन व्यवसायाला योग्य दिशा देण्याची सुविधा. मायक्रो बिझनेस, कॉन्ट्रॅक्टर कर्ज, इंजिनिअरिंग कर्ज, हॉटेल कर्ज, ऊर्जा कार्यक्षमता कर्ज, वाहन व्यवसाय कर्ज, जीएसटी कर्ज यांसह विविध एमएसएमआय () कर्ज योजनांचा लाभ घेता येणार आहे. अहिल्यानगर क्षेत्राचे क्षेत्रीय प्रमुख श्री. नरेश कुमार दुबे यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून परिसरातील जास्तीत जास्त उद्योजक व व्यवसायिकांनी सहभागी होऊन या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी बँक अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आव्हान केले.

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने दिव्यांग आणि अंध बांधवांना मिठाई, दिवाळीचा फराळ वाटप

अहिल्यानगर- दिवाळी आणि भाऊबीज हा आनंद, आपुलकी, प्रेम आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे. या सणाचा गोडवा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या भावनेतून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने दिव्यांग आणि अंध बांधवांना मिठाई, दिवाळीचा फराळ तसेच टॉवेलचे वाटप करण्यात आले. ग्रुपचे सदस्य सार्थक चोपडा आणि जहीर सय्यद यांच्या पुढाकारातून दिव्यांग व अंध व्यक्तींसाठी दिवाळी भेट उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित दिव्यांग आणि अंध बांधवांना मिठाई, फराळ आणि टॉवेलचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, उद्योजक राजू चंगेडिया, लॉरेन्स स्वामी, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, सार्थक चोपडा, जहीर सय्यद, ताराचंद ठोकळ, संजय भिंगारदिवे, रमेश वराडे, अभिजीत सपकाळ, दिलीप ठोकळ, दीपक धाडगे आदी उपस्थित होते.

श्रीमती नर्मदा भिमराज बारस्कर यांचे दुःखद निधन

अहिल्यानगर- सावेडी येथील श्रीमती नर्मदा भिमराज



बारस्कर यांचे सोमवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सावेडी गावातील प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात त्यांचा सातत्याने सहभाग असायचा. बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी दशक्रिया विधी नालेगाव अमरधाम येथे होणार आहे. कै. नर्मदाबाई यांच्या पश्चात मुलगा एसएससी बोर्ड पुणे चे माजी सदस्य तसेच सन फार्मा विद्यालयातील शिक्षक शंकर भिमराज बारस्कर सर, दत्तात्रय भिमराज बारस्कर, मुलगी मंदा सुरेश जाधव तसेच नातू ,पुतणे यांच्या सह मोठा परिवार आहे.

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या अहिल्यानगर केंद्राचा उद्घाटन समारंभ उत्साहात संपन्न

नाट्यगृहाचा प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे महापौर ज्योती गाडे यांचे आश्वासन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२६-२७ च्या प्राथमिक फेरीतील अहिल्यानगर केंद्राचा उद्घाटन समारंभ उत्साहात संपन्न झाला. या समारंभास अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योती गाडे, मराठी चित्रपट निर्माते श्री. बलभीम पठारे, ज्येष्ठ रंगकर्मी सौ. मीरा महाजनी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्री. क्षितिज झावरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेचे अध्यक्ष श्री. प्रसाद बेडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्पर्धेचे सन्माननीय परीक्षक श्री. राजेश जाधव, श्री. अरुण शेलार आणि सौ. प्रिया नेर्लेकर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी महापौर सौ. ज्योती गाडे यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व नाट्यसंस्था आणि कलाकारांना शुभेच्छा दिल्या. तसेच अहिल्यानगर शहरातील प्रलंबित नाट्यगृहाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करून हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. शहरातील नाट्यकलावंतांना हक्काचे नाट्यगृह उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महापौरांनी दिलेल्या आश्वासनाचे उपस्थितांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र समन्वयक सागर मेहेत्रे यांनी केले, तर सहसमन्वयक जालिंदर शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले.

या स्पर्धेमुळे अहिल्यानगरच्या नाट्यचळवळीला नवी ऊर्जा मिळणार असून, विविध नाट्यसंस्थांच्या दर्जेदार नाट्यप्रयोगांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

कनोजिया परदेशी समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– नगर येथील कनोजिया परदेशी समाजातर्फे सत्यनारायण महापुजा व महाप्रसादाचे आयोजन महासैनिक लॉन येथे केले होते. महापुजेला ६२ वर्षे पूर्ण झाली. या कार्यक्रमाला सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या २२ वर्षापासून समाजातील मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढावा यासाठी या दिवशी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. या वर्षातील विविध इयत्तामध्ये चांगले गुण प्राप्त केल्याबद्दल एकूण ४० विद्यार्थ्यांना परदेशी परिवारातर्फे स्मृतीचिन्ह व समाजातर्फे रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

यावेळी इयत्ता दहावीमध्ये ९५% गुण प्राप्त केल्याबद्दल नुपुर रोहित परदेशी हिचा स्व. गुलाबचंद कनोजिया परिवार व नंदलाल कनोजिया यांच्या तर्फे स्मृती चिन्ह व रोख रक्कम देवून विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उच्च शिक्षण प्राप्त केल्याबद्दल नंदिनी दिनेश कनोजिया, स्नेहा संजय कनोजिया, पलक सचिन परदेशी यांचा व पावर लिपटींग चॅम्पीयनशिप स्पर्धे तील राज्यस्तरीय खेळाडू मयंक सुरजप्रकाश कनोजिया यांचाही राजु बलीराम परदेशी यांच्यातर्फे स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

सेवानिवृत्त झाल्याबद्दल सुदेश लाला परदेशी व गोविन्द गुलाब कनोजिया यांचा स्मृती चिन्ह, श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी महाप्रसादाची व्यवस्था अजय कनोजिया परीवारातर्फे करण्यात आली होती. या प्रसंगी प्रा.डॉ. केवलकृष्ण कनोजिया, राजकुमार परदेशी, राजेन्द्र कनोजिया, हिरालाल परदेशी, दिनेश चौधरी, प्यारेलाल कनोजिया, दिनेश परदेशी, सूरज कनोजिया आदिसह समाजातील बंधू-भगिंनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सुत्रसंचालन गोविन्द कनोजिया यांनी केले. मंच व्यवस्थापन तसेच कार्यक्रम व्यवस्थेसाठी ठाकूरदास परदेशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

ग्राहकांशी आपुलकीचे नाते जपणारे उपक्रम कौतुकास्पद : महापौर ज्योती गाडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– गुलमोहर रोड येथील डेली नीड्स सुपर शॉपीच्या वतीने दिवाळीनिमित्त ग्राहकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या लकी ड्रॉची सोडत महापौर सौ. ज्योती गाडे यांच्या हस्ते काढण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते भाग्यवान विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला नगरसेविका गौरी अजिंक्य बोरकर यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी महापौर ज्योती गाडे म्हणाल्या की, ग्राहक आणि व्यापारी यांच्यातील नाते हे विश्वासावर आधारित असते. ग्राहकांना चांगली सेवा देतानाच त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी ''डेली नीड्स'' सुपर शॉपीने दिवाळीनिमित्त लकी ड्रॉसारखा उपक्रम राबविला, ही कौतुकास्पद बाब आहे. स्थानिक व्यावसायिकांनी ग्राहकांशी आपुलकीचे संबंध जपत व्यवसायाची वाटचाल करावी. अशा उपक्रमांमुळे ग्राहकांनाही खरेदीचा आनंद आणि बक्षीस जिंकण्याची संधी मिळते.

मनसुख वाबळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्राहकांनी आजपर्यंत दिलेले प्रेम, विश्वास आणि सहकार्य हीच आमची खरी ताकद आहे. ग्राहकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच दिवाळीचा आनंद त्यांच्यासोबत साजरा करण्याच्या उद्देशाने लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले. सावेडी विभागातील ग्राहकांनी या उपक्रमाला मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला, याचा विशेष आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

या लकी ड्रॉमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ज्योती कर्डिले यांनी पटकावले. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सुनीता अकोलकर यांना, तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सौ. एरंडे यांना मिळाले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ व भेटवस्तूंचे वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– वर्षभर विविध ठिकाणी जबाबदारीने सुरक्षा सेवा बजावणाऱ्या सुरक्षा रक्षकांची दिवाळी गोड व्हावी, तसेच त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांचे मनोबल उंचावावे, या उद्देशाने ''नॅशनल एक्स सर्विस मॅन सेक्युरिटी गार्ड''च्या वतीने सुमारे ५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ व भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. संस्थेचे संचालक मनसुख वाबळे हे दरवर्षी दिवाळीनिमित्त आपल्या कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देऊन त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण साजरे करतात. सुरक्षा रक्षक आपापल्या कार्यस्थळी अत्यंत जबाबदारीने कर्तव्य बजावत असतात. संस्थेने सोपविलेली सुरक्षा व्यवस्था सांभाळताना ते स्वतःची जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडतात. त्यांच्या या कामाची जाणीव ठेवून त्यांना प्रोत्साहन मिळावे, काम करण्याचा उत्साह वाढावा आणि त्यांचे मनोबल उंचावावे, या भावनेतून दरवर्षी हा उपक्रम राबविला जात असल्याचे सागर वाबळे यांनी सांगितले.
'नॅशनल एक्स सर्विस मॅन सेक्युरिटी गार्ड' या संस्थेच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरातील नामांकित शॉप्स, हॉस्पिटल्स, शोरूम, बँका आदी विविध आस्थापनांमध्ये सिक्युरिटी गार्ड सेवा पुरविली जाते. तसेच हाऊसकीपिंगची सेवाही संस्थेमार्फत दिली जाते. विविध क्षेत्रांमध्ये सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांच्याशी आपुलकीचे नाते जपण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे. दिवाळीच्या निमित्ताने मिळालेल्या फराळ व भेटवस्तूंमुळे ५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. कर्मचाऱ्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम संस्थेच्या कर्मचारी हिताच्या भूमिकेचे दर्शन घडविणारा ठरला.

पुरूष सगळीकडेच 'दीन' आहे महिलांचे संरक्षण कायदे 'ढाल' की 'तलवार'



लेखक
ॲड.शिवाजी अण्णा कराळे
जिल्हाध्यक्ष- पुरूष हक्क संरक्षण समिती
शाखा अहिल्यानगर
९९ २२ ५४५ ५४५

नमस्कार मित्रांनो, १९ नोव्हेंबर हा जागतिक पुरूष हक्क दिन आहे. त्या निमित्त सदरचे विवेचन करावे वाटते. सर्व सामान्य जनतेला पूर्वीचे जुने कायदेच अजुन माहीत आहेत म्हणूनच त्याच कायद्याचा उल्लेख सदर अर्टिकल मधे केलाय.

आपला भारत देश पुरूष प्रधान असला तरीही भारताला आपण 'भारतमाता'म्हणतो. जगा मध्ये असा एकच देश आहे ज्याला गर्वाने भारतमाता म्हणून संबोधलं जाते. राजमाता जिजाऊ मॉ साहेब, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई, पहिल्या महिला शिक्षिका आदरणीय सावित्रीबाई फुले, चॉद बिबी, मदरसा तेरेसा, माता रमाबाई अंबेडकर, फातिमा बीबी या आणि अशा कितीतरी महान महिलांचा आदर्श आजही मोठ्या भक्तिभावाने जपला जातोय. खरं तर महिला भगिनींनी या महान महिलांचा आदर्श ठेवलाच पाहिजे. आपला भारत देश हा लोकशाही माननारा देश आहे. त्यामुळे घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधान आणि लोकसभा व राज्यसभेतील कायदे मंडळाच्या वतीने जे कायदे आहेत त्याचे पालन करणे ही सर्व भारतीय जनतेची जबाबदारी आहे. देश स्वतंत्र झाल्यावर महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायदे निर्माण केले आणि महिलांना संरक्षण कवच दिले. शहाबानो केस प्रकरणा पासुन जर एखाद्या महिलेला तिचा पती नांदवत नसेल तर तीला क्रिमीनल प्रोसीजर चे कलम १२५ प्रमाणे नव-या कडून खावटी किंवा पोटगी मागण्याचा अधिकार कायद्याने दिलेला आहे. तसेच एखाद्या महिलेच्या सासर कडील मंडळी तिचा विनाकारण छळ करीत असतील व पैशाची मागणी करत असतील तर ती महिला भा.द.वि. कलम ४९८ प्रमाणे तिच्या सासरच्या मंडळी विरूध्द गुन्हा दाखल करू शकते. तसेच आता सरकारने महिलांना अजुन जास्त संरक्षण मिळावे म्हणून 'डोमॅस्टीक व्हायोलेशन ॲक्ट २००५' हा कायदा पारित केला आहे. हा सगळा उहापोह करण्याचा उद्देश एकच आहे की, आपल्या देशात महिलांना कडे अजुनही 'अबला नारी' म्हणूनच पाहिले जाते. वास्तविक पाहता आज महिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहे. शासकीय, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमठवला आहे. भारतात पंतप्रधान पदापासुन राष्ट्रपती पदापर्यंत महिला त्यांचे कर्तृत्वाने पुढे आलेल्या आहेत. तरीही आपण अजुन सुद्धा महिलांना अबला म्हणून संबोधतो. वास्तविक आता महिला अबला नसुन सबला झालेल्या आहेत. एक गोष्ट मात्र निश्चितच आहे की काही ठिकाणी महिला भगिनींना चांगली वागणूक दिली जात नाही व त्यांचेवर काही नराधम अत्याचार करतच आहेत. मुलगी अगदी स्वतःच्याच घरात सुद्धा सुरक्षित नाही याची अनेक उदाहरणे घडलेली आहेत. सगळ्यात घाणेरडी गोष्ट म्हणजे जवळच्या नातेवाईकां कडूनच अनेक ठिकाणी महिलावर अत्याचार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. महिला भगिनींना सुरक्षितता मिळावी म्हणून त्यामुळे सरकारने महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायद्याची ''ढाल'' दिली आहे. त्यामुळे शासनाचे आभारच मानले पाहिजेत. कारण कोणालाही वाटते की, आपल्या घरातील महिला भगिनीं सुरक्षित राहिली पाहिजे, आणि त्यात वावगे काहीच नाही. परंतु जसजसे महिला सुशिक्षित झाली आणि घराबाहेर पडू लागली, नोकरी, व्यवसाय करू लागली आणि स्वकमाई ची रक्कम तिच्या हातात येऊ लागली तेव्हा तिच्या मनात सुद्धा ''इगो'' प्रोब्लेम निर्माण झाला. मग तिच्या सुद्धा स्वतंत्र स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्यासाठी इच्छा पल्लवीत झाल्या. अर्थात महिलांनी स्वतःच्या इच्छे प्रमाणे जीवन जगण्यात वावगे काहीच नाही. पण काही काही महिला लग्नाच्या नंतर घरातील सासुसासरे यांना ''डस्टबीन'' समजायला लागल्या व लगेच पतीला घेऊन वेगळे रहायला लागल्या. त्यामुळे घराचे घरपण नाहीसे झाले. मग संसारात भांडण तंटा व्हायला लागले आणि प्रकरणे घराचे उंबरठे ओलांडून कोर्टात आणि पोलिस स्टेशनला जायला लागली. लग्नाच्या नंतर चार पाच महिने सुद्धा संसार कसाबसा होऊ लागल्याने अनेक जण घटस्फोट घेण्यापर्यन्त गेले. या सगळ्या गोष्टी पहाता एक गोष्ट निश्चितच लक्षात येते की, ॲडजस्टमेंट करायला कुणीच तयार नाही. मग काही काही महिलांनी विनाकारण सासुसासरे आणि नवरा यांना कायद्याचा धाक दाखवून वेगवेगळ्या स्वरूपात गुन्हे दाखल करायला सुरुवात केली. वास्तविक पहाता '' घर दोघांचं असतं, दोघांनी सावरायचं असतं, एकानी पसरविलं तर दुस-यांनी आवारायचं असतं '' ही संकल्पनाच राहिली नाही. त्यातच महिलां साठी सामाजिक काम करणा-या काही चांगल्या संघटना व्यवस्थित मार्गदर्शन करतात आणि तुटणारा संसार जोडण्याचा प्रयत्न करतात ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे. परंतु काही काही संघटना विनाकारण महिला भगिनींना भडकविण्याचे काम करतात आणि सासर कडील मंडळी विरूध्द वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल करण्यास प्रवृत्त करतात. आता तर डी.व्ही. ॲक्ट २००५ चा सर्रासपणे दुरूपयोग होताना दिसत आहे. सध्या महिला पोटगी साठी कलम १२५ ची केस, भा. द.वि. कलम ४९८ , डि. व्ही. ॲक्ट २००५ आणि तसेच हिंदू विवाह कायद्या नुसार केसेस चे पुर्णपणे 'पॅकेजच' न्यायालयात दाखल करतात. वर्षानुवर्षे कोर्टात चकरा मारतात आणि नंतर कधी तरी आपसात तडजोड करतात. खरं तर पती पत्नीच्या भांडणात बिचा-या लहान मुलांचे खुपच हाल होतात. वास्तविक पहाता आपण या कायद्याचा कायदेशीर पणे थोडा जरी विचार केला तरी या मध्ये कुठेही फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली नाही. फक्त केवळ आणि केवळ पुरूषांना अर्थिक आणि शारीरिक व मानसिक त्रास देणे एवढाच उद्देश यात स्पष्ट पणे दिसुन येतो. तसेच एखाद्याची बायको व्यभिचार करत असेल, स्वतंत्र कमाई असेल, स्वतः होउन नांदत नसेल व नव-याचे घर सोडून गेली असेल तर तीला पोटगी मागण्याचा अधिकार नाही अशा स्वरूपाचे अनेक न्याय निर्णय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांनी दिलेले आहेत. तसेच एखाद्याची बायको वेळोवेळी पतीला व सासुसासरे यांना अपमानास्पद वागणूक देत असेल तर पतीला घटस्फोट मागण्याचा अधिकार सुद्धा आहे. तसेच एखाद्याची बायको नोकरी करत असेल आणि नवरा काहीच काम धंदा करत नसेल किंवा अपंग असेल तर तो बायको कडून पोटगी सुद्धा मागु शकतो. तसेच बायकोने शारिरीक आणि मानसिक छळ केल्या बद्दल नवरा सुद्धा पोलिस स्टेशन ला तक्रार अर्ज दाखल करू शकतो. असे असले तरी पोलिस प्रशासन सुद्धा महिलांनी पुरूषांचे विरूध्द तक्रार दिली की लगेच नोंदणी करून घेतात पण एखादा पती आपल्या पत्नीच्या विरोधात तक्रार करायला पोलिस स्टेशन ला गेला तर पोलिस त्याची तक्रार नोंदवून घेत नाहीत हे दुर्दैव आहे. आता तर महिलांनी व्यभिचार केला तरी गुन्हा दाखल केला जात नाही. तसेच तिच्या पहिल्या पती पासुन झालेल्या अपत्याची जबाबदारी दुस-या पतीवर येते अशा कायदेविषयक तरतुदी आहेत. एकंदरीत पुरूष हा सगळीकडेच ''दीन'' होत चाललाय. महिलांचे कौतुक करण्या साठी ८ मार्च हा महिलादिन म्हणून साजरा केला जात आहे. त्याचे स्वागत आहेच, पण कौतुक करण्या सारखे पुरूष या भारतात जन्मलेच नाहित का? मग पुरूष हक्क दिन का साजरा करत नाहीत. खरंतर सर्व पुरूषांनी यावर आवाज उठवून सरकारला जाग आणली पाहिजे.

जर कायदा सगळ्यानां समान असेल तर पोलिस प्रशासन यांनी महिला व पुरुष असा दुजाभाव का करावा हाच प्रश्न निर्माण झाला आहे.भरोसा सेल मधे सुध्दा पुरुषांवर अन्याय होत आहे. तिथे पण त्याची तक्रार घेतली जात नाहीत. पुरूषांवर झालेल्या अन्यायावरुन अद्याप एकाही महिले विरूध्द तक्रार दाखल झाल्याचे वाचनात येत नाही. आत्ता पर्यंत महिलांनी सासुसासरे आणि नवरा यांचे विरूध्द दाखल केलेल्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याचे प्रमाण सुद्धा फारच कमी आहे. याचाच अर्थ असा की काही महिला विनाकारण सासुसासरे आणि नवरा यांना त्रास देण्यासाठी तक्रारी दाखल करतात आणि कायद्याचा वापर '' तलवार '' म्हणून करतात. काही ठिकाणी तर पुरूष वर्गाला ब्लॅकमेल करण्याचे प्रकार सुद्धा घडत आहेत. सिनेमा सृष्टीत असे अनेक अपप्रकार घडतात आणि त्यामुळे काही नटांना आत्महत्या करायची वेळ आली. तसेच आदरणीय भैय्यू महाराज देशमुख यांचे बरोबर सुद्धा ब्लॅकमेल चा प्रकार घडलाच होता. कधी कधी प्रेम प्रकरणातून अशा घटना घडतच असतात. कधी कधी महिला कडून पुरूषा विरुद्ध लग्नाचे अमिष दाखवून लैंगिक शोषण केले अशाही तक्रारी दाखल करण्यात येतात. पण या तक्रारी मध्ये सुद्धा ब-याच वेळा ब्लॅकमेल करण्याचा हेतू असतो हे सुद्धा नाकारता येणार नाही. जर खरोखरच जबरदस्तीने हे प्रकार घडत असतील अशा नराधमांना कठोर शिक्षा दिली पाहिजे असे वाटते आहे. परंतु हे जरी सत्य असले तरीही जवळपास ४५% महिला भगिनींना सासरच्या मंडळी कडून विनाकारण त्रास होत आहे हे सत्य सुद्धा नाकारता येणार नाही. अनेक ठिकाणी काही लालची मंडळी महिलांना जाणुन बुजुन त्रास देतात हे सुध्दा नाकारता येणार नाही. त्या नालायक माणसांना शिक्षा झालीच पाहिजेत अशी भूमिका पुरूष हक्क संरक्षण समितीची आहेच.अनेक पुरूषांनी पत्नी व तिच्या माहेर कडील मंडळी च्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. महिला खोटे रडून रडून आपली कहाणी सांगतात त्यामुळे महिलांचे सांगण्यावर लगेच विश्वास ठेवला जातो, पण पुरूषांना रडता येत नाही त्यामुळे त्यांचेवर समाज विश्वास ठेवायला तयार नाही. सध्याची वाईट परिस्थिती पहाता लग्न पाच पंचवीस वर्षे टिकेल अशी परिस्थिती राहिली नाही. या पुढे पुरूषांनी सुद्धा सावध रहायला शिकलं पाहिजे. काही मुलींना फक्त नवराच पाहिजे असतो,त्याचे इतर नातेवाईक नको असतात. म्हणून सर्व कुटुंब व्यवस्थाच बिघडते की काय अशी भीती वाटायला लागली आहे. खरोखरच जर महिला भगिनींना त्रास असेल तर त्यांनी बिनधास्त पणे कायदेशीर कारवाई करायला हरकत नाही पण किरकोळ कारणावरून संसार उधळून लावणे योग्य नाही. म्हणून महिला भगिनींनी संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचा वापर स्वतःच्या संरक्षणासाठी ''ढाल'' म्हणून करावा पण इतरांना मारण्यासाठी ''तलवार'' म्हणून करू नये हि विनंती. आज पुरूषांवर होणारे अन्याय, अत्याचार याचे कडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. जसा महिलांवर अत्याचार झाले तर त्या महिला आयोगाकडे तक्रार करतात पण पुरूषांवर अन्याय झाल्यास त्याने कुणाकडे तक्रार करायची हा अनुत्तरित प्रश्न निर्माण होत आहे. त्या साठी पुरूष आयोग व्हायला पाहिजेत. पुरूषांची बाजु खंबीरपणे उचलून घेऊनच नाशिक येथे १९९६ मधे पुरूष आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारी पुरूष हक्क संरक्षण समितीची स्थापना करण्यात आली. त्या साठी ॲड धर्मेंद्र चव्हाण, ॲड बाळासाहेब आकडे,ॲड बाळासाहेब पाटील डॉ सुनिल घाडगे आणि त्यांचे सहकारी कार्यरत आहेत. दिनांक २९.११.२६ रोजी परभणी येथे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न होत आहे. त्याचे आयोजन डॉ सुनिल जाधव आणि त्यांचे सहकारी करत आहेत. जागतिक पुरूष हक्क संरक्षण दिनानिमित्त सर्व पुरूषांना न्याय मिळो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

शिवसेनाच्यावतीने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दीर्घकाळ मराठी जनतेच्या हृदयावर राज्य केले – संभाजी कदम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे राज्याच्या राजकारणात इतका दिर्घकाळ एखाद्या राजकीय पक्षाचे नेतृत्व अन्य कुठल्याही राजकीय नेत्याने केले नाही हे सत्य आहे. आपल्या निर्भिड, बेधडक व सडेतोडपणा हे त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळे तसेच प्रेमळ व तितकाच मायेचा आधार देणार्या स्वभावासाठी शिवसैनिक आपले दैवत मानत. त्यांचा शद्ब म्हणजे शब्द असत. त्यामुळे इतका दीर्घकाळ त्यांनी मराठी जनतेच्या हृदयावर राज्य केले. असा नेता पुन्हा होणे नाही. आयोध्येत श्रीराम मंदिर निर्माण व्हावे, ही मनापासून इच्छा होती, त्यासाठीच्या आंदोलनात शिवसैनिकांना सहभागी होण्याचे आदेश दिले होते. असे प्रतिपादन शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम यांनी केले.

शिवसेनाच्यावतीने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त शिवालय येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे , शहरप्रमुख संभाजी कदम, गटनेते दत्तात्रय कावरे ,संजय शेंडगे , दिलीप सातपुते,विक्रम राठोड ,बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे ,सचिन शिंदे ,संदीप दातरंगे , सुरेश तिवारी ,ऍड स्वाती जाधव ,काका शेळके ,परेश लोखंडे, कैलास शिंदे,केलास शिंदे ,अरुण झेंडे ,गणेश झिंजे ,आबा गुंड ,योगेश गलांडे ,रणजित परदेशी ,अभिषेक भोसले ,प्रताप गडाख,संजय डागा,आदिंसह शिवसैनिक उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले, शिवसेना हा पक्ष सर्वसामान्यांचा पक्ष आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे बाळासाहेब ठाकरे यांचे तत्व शिवसैनिक राबवतात. त्यामुळे सर्वसामान्यांना न्याय देण्याचेच काम पक्षाच्यावतीने करण्यात येत असल्याचे सांगितले.

यावेळी विक्रम राठोड म्हणाले, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळेच आज शिवसैनिक ताठ मानेने उभा आहे.

राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत नगरच्या लेकीची सुवर्णभरारी; सलोनी प्रसादने रचला इतिहास!

जिल्ह्यातून सुवर्णपदक पटकावणारी एकमेव खेळाडू; अंतिम सामन्यात पिछाडीवरून मुसंडी मारत दिल्लीच्या प्रतिस्पर्धीवर मिळवला दणदणीत विजय

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– जिद्द, चिकाटी, कठोर मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर अहिल्यानगरच्या सलोनी प्रसाद हिने जम्मू-काश्मीर येथे आयोजित ७० व्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत सलोनीने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, या स्पर्धेत संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून सुवर्णपदक मिळवणारी ती एकमेव खेळाडू ठरली आहे.

सलोनी ही स्टार तायक्वांदो अॅकॅडमीची खेळाडू आहे. तिच्या या यशामागे दररोज चार ते पाच तासांचा कठोर सराव, घाम गाळण्याची तयारी, शिस्त आणि अनेक सुखसोयींचा केलेला त्याग आहे. सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्दीच्या बळावर तिने राष्ट्रीय स्तरावर सुवर्णयश संपादन केले आहे.

सलोनीच्या सुवर्णपदकापर्यंतच्या प्रवासात तिचे मुख्य प्रशिक्षक गणेश धीवर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. तसेच स्टार तायक्वांदो अकॅडमीचे प्रशिक्षक रवी यादव, विशाल जंजाळ, सुनील धीवर, आकांक्षा दराडे आणि वैष्णवी कदम यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे व प्रोत्साहनामुळे तिला हे यश मिळवता आले.

सलोनीने स्पर्धेतील प्रत्येक फेरीत आपल्या कौशल्याची आणि आत्मविश्वासाची छाप पाडली. पहिल्या सामन्यात पंजाबच्या खेळाडूवर सहज विजय मिळवला. त्यानंतर मणिपूरच्या खेळाडूचा १५-० अशा एकतर्फी गुणफरकाने पराभव करत आपले आक्रमक कौशल्य सिद्ध केले. पुढील फेरीत मध्य प्रदेशच्या खेळाडूवर मात केल्यानंतर उपांत्य फेरीत उत्तराखंडच्या खेळाडूला ८-३ आणि १०-२ अशा गुणफरकाने पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम सामना दिल्लीच्या बलाढ्य प्रतिस्पर्धी खेळाडूविरुद्ध होता. सुरुवातीला ०-३ अशा गुणफरकाने पिछाडीवर पडल्यानंतरही सलोनीने हार मानली नाही. संयम, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर तिने सामन्यात जोरदार पुनरागमन केले. ९-३ अशी आघाडी घेत अखेर १२-३ अशा दणदणीत गुणफरकाने विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. सलोनीच्या या ऐतिहासिक यशाबद्दल महाराष्ट्र तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष अविनाश बारगजे, जिल्हा सचिव संतोष बारगजे, मार्गदर्शक शकील सय्यद, शहर संघटनेचे सचिव सुरेश वाघ, अध्यक्ष संजय शिंदे, स्टार तायक्वांदोचे अध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, तसेच सूरज शिंदे, शुभम बागल आणि आसिफ शेख यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सलोनीच्या या सुवर्णकामगिरीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राचा मान उंचावला असून, तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचा पाचवा सिझन २१ व २२ नोव्हेंबरला रंगणार!

पुण्यातील नामांकित फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य राहणार उपस्थित; अहिल्यानगरच्या फुटबॉलचा महासंग्राम! आठ संघांतील १०५ खेळाडूंचा मैदानावर थरार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा येत्या २१ व २२ नोव्हेंबर रोजी नगर क्लबच्या मैदानावर रंगणार आहे. दिवस आणि रात्री अशा दोन सत्रांमध्ये फ्लडलाइटच्या प्रकाशात सामने खेळविण्यात येणार असून, शहरातील फुटबॉलप्रेमींना दोन दिवस स्थानिक खेळाडूंच्या कौशल्याचा आणि चुरशीच्या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.२१ नोव्हेंबर) संध्याकाळी होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत आठ संघांमधील १०५ खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेतेपदासाठी संघांमध्ये होणारी चुरस, खेळाडूंचे तंत्रकौशल्य, वेगवान खेळ आणि गोल करण्यासाठीची धडपड यामुळे स्पर्धेत चांगलीच रंगत निर्माण होण्याची अपेक्षा आहे. स्थानिक फुटबॉलपटूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे आणि अहिल्यानगरमध्ये फुटबॉल संस्कृती अधिक मजबूत व्हावी, या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून या लीगचे आयोजन करण्यात येत आहे.

यंदाच्या पाचव्या पर्वाचे विशेष आकर्षण म्हणजे पुण्यातील सिटी पुणे फुटबॉल क्लब आणि पुणे पायोनिअर्स फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य स्पर्धेसाठी उपस्थित राहणार आहेत. ते दोन दिवस खेळाडूंच्या कामगिरीचे निरीक्षण करून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करणार आहेत. निवड झालेल्या गुणवंत खेळाडूंना संबंधित क्लबच्या संघात स्थान मिळविण्याची तसेच व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील खेळाडूंना शहराबाहेरील मोठ्या फुटबॉल व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. ही स्पर्धा केवळ मनोरंजन किंवा स्थानिक पातळीवरील स्पर्धा न राहता खेळाडूंच्या भविष्यातील वाटचालीसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार असल्याची माहिती नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांनी दिली.

स्पर्धेपूर्वी नुकताच खेळाडूंचा लिलाव पार पडला. या लिलावामध्ये शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंना आपल्या संघात घेण्यासाठी संघमालकांमध्ये चांगलीच चुरस पाहायला मिळाली. खेळाडूंच्या कौशल्याचा विचार करून संघमालकांनी त्यांच्यावर लाखो रुपयांची बोली लावली. या प्रक्रियेमुळे स्थानिक खेळाडूंना व्यावसायिक फुटबॉल स्पर्धेचा अनुभव मिळण्याबरोबरच त्यांच्या गुणवत्तेला आर्थिक आणि क्रीडाक्षेत्रातील महत्त्व प्राप्त होत आहे.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा हे आठ संघ विजेतेपदासाठी मैदानात उतरणार आहेत. या सर्व संघांमध्ये मिळून शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश आहे. संघमालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टोटू, रोहित रामदिन, सचिन सेलोत, ॲड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी हे जबाबदारी सांभाळत आहेत.

स्पर्धेच्या आयोजनासाठी विविध संस्थांचे सहकार्य लाभत आहे. अभिनंदन आणि रुही भन्साळी (अवित्री मोशन) हे को-पॉवर, राजेश भंडारी (महावीर ग्रुप) किट स्पॉन्सर, तर प्रणिल मुनोत (कॉनप्लेक्स) को-स्पॉन्सर आहेत. याशिवाय राम एजन्सी, शिवम सायकल, फन्की लॅण्ड, अमित ट्रेडर्स, जलाराम फुड्स आणि खेलोफाय यांचेही सहकार्य लाभले आहे.

समाजातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंद; दात्यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकी जपली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दिवाळी हा आनंद, उत्साह आणि एकमेकांमध्ये वाटण्याचा सण आहे.आपल्या आनंदात समाजातील गरजू कुटुंबांचाही आनंद सहभागी व्हावा.आणि त्यांच्या घरातही दिवाळीचा दिवा आनंदाने उजळावा, या सामाजिक भावनेतून दिवाळीनिमित्त गरजू कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.

हरे कृष्ण सत्संग केंद्र,श्री लक्ष्मी नारायण सामाजिक बहू उद्देशीय संस्था आणि मित्र परिवार यांच्या तर्फे हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत प्रत्येक कुटुंबाला दैनंदिन गरजांसाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्यात आले.यामध्ये आटा,तांदूळ,साखर,खाद्यतेल, डाळ आणि शेंगदाणे या वस्तूंचा समावेश होता.

या सामाजिक उपक्रमासाठी आर्थिक सहकार्य करणारे बाली जोशी,गिरीश जोशी(बन्सीमहाराज),पियुष संचेती,गिरीश ओझा,निलेश लोढा, किशोर बेंद्रे,उमेश झेंडे, अक्षय भिंगारे,भारत थोरात आदींनी मोलाचे योगदान दिले.

सणासुदीच्या काळात गरजू कुटुंबांना मदतीचा हात देत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा हा छोटासा प्रयत्न ठरला. समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने गरजूंच्या मदतीसाठी पुढे यावे आणि सणांचा आनंद सर्वांसोबत साजरा करावा,हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. माणुसकीची भावना जपत केलेल्या या उपक्रमातून आनंद वाटल्यानेच तो द्विगुणित होतो हा सामाजिक संदेश देण्यात आला.

वाढदिवसाचा आनंद अनाथ मुलांसोबत; सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम

सान्वीच्या वाढदिवसानिमित्त बालघरातील मुलांना दिवाळीचा आनंद; महापौर ज्योती गाडे यांनीही मुलांसोबत केला वाढदिवस साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे, भेटवस्तू आणि आनंदोत्सव नव्हे, तर आपल्या आनंदात समाजातील वंचित घटकांनाही सहभागी करून घेण्याची संधी असते. याच सामाजिक भावनेतून भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष इंजि. रोहन कुटे पाटील यांनी आपली कन्या सान्वी हिचा वाढदिवस ६ नोव्हेंबर रोजी उपनगरातील बालघर प्रकल्पातील अनाथ मुलांसोबत साजरा केला. या उपक्रमातून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासोबतच वाढदिवस साजरा करण्याचा एक वेगळा सामाजिक आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला.

या निमित्ताने बालघरातील मुलांना दिवाळीनिमित्त फटाक्यांचे वाटप करण्यात आले, तसेच सर्व मुलांसाठी मिष्टान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सण-उत्सव आणि वाढदिवसाच्या आनंदापासून वंचित राहणाऱ्या मुलांनाही या आनंदात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. विशेष म्हणजे, अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडे यांचाही वाढदिवस असल्याने त्यांनीदेखील बालघरातील मुलांसोबत केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यामुळे मुलांसाठी हा दिवस अधिकच आनंददायी ठरला. यावेळी कुटे पाटील परिवारासह मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

याप्रसंगी इंजि. रोहन कुटे पाटील यांनी नागरिकांना सामाजिक जाणीव जपत वाढदिवस आणि कौटुंबिक आनंदाचे क्षण साजरे करण्याचे आवाहन केले. वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्याऐवजी अनाथ, गरजू आणि वंचित मुलांसोबत आनंदाचे क्षण घालविल्यास त्यांच्या जीवनातही आनंद निर्माण होऊ शकतो. अशा मुलांना आपलेपणाची जाणीव देणे, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे आणि त्यांच्यासोबत काही वेळ घालविणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील आनंदाच्या प्रसंगी समाजातील गरजू घटकांचा विचार करून असे उपक्रम राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

समाजातील वंचित मुलांना आनंदाचे क्षण देणारे असे उपक्रम केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता त्यातून सामाजिक संवेदनशीलता आणि मदतीची भावना वाढीस लागणे गरजेचे आहे. सान्वीच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमाने हाच सकारात्मक संदेश दिला.

लहुजी वस्ताद साळवेंच्या समाधीस्थळी अहिल्यानगरचे सामाजिक कार्यकर्ते नतमस्तक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पुणे येथील संगमवाडी पुलाजवळ असलेल्या त्यांच्या समाधीस्थळी जाऊन नतमस्तक होत अभिवादन केले. यावेळी लहुजी वस्तादांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या क्रांतिकारी कार्याला उजाळा देण्यात आला. या अभिवादन सोहळ्यास अहिल्यानगरमधील लहुसेनेचे कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे, डॉ. सुनील सकट, लहु खंडागळे, संजय त्रिभुवन, मिनाक्षीताई सकट, शेषराव कारखिले, भगवानराव वैरागर, कडुबाबा लोंढे, लक्ष्मण साबळे आदींसह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी समाधीस्थळी अभिवादन केले.

दरम्यान, महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त महासंघाच्या वतीने विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शासनाकडून पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मानपूर्वक आर्थिक व सामाजिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्तांना दरमहा १५ हजार रुपये पेन्शन सुरू करावी, तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या एसटी बसमधून राज्यभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला भारतरत्न पुरस्कार प्रदान करावा, अशी मागणीही करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

(पान १ वरून)

गणेश-कार्तिकेय चरित्रातून ज्ञान, बुद्धी आणि कर्तव्यनिष्ठेची शिकवण – ह.भ.प. समाधान महाराज शर्मा

कर्तव्यपालनातून आदर्श निर्माण केला. गणेश व कार्तिकेय चरित्र हे केवळ पौराणिक कथांपुरते मर्यादित नसून मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे आध्यात्मिक मार्गदर्शन आहे. या चरित्राचे श्रवण केल्याने भक्तिभाव, संस्कार, सद्बुद्धी आणि धर्माप्रती प्रेरणा मिळते. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये नाथ संप्रदायाची परंपरा मोठी असल्याचेही ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी सांगितले.

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या पाचव्या दिवशी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी गणेश व कार्तिकेय चरित्राचे निरूपण केले. यावेळी धनश्री सुजय विखे पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे हिराकांत रामदासी,नगरसेवक मनोज कोतकर, गणेश कवडे, ह.भ.प. अशोक महाराज जाधव, नगरसेविका गौरी बोरकर, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील,नगरसेवक सुमित लोंढे, महेश लोंढे,नगरसेविका आशाताई कातोरे, हरप्रीतकौर गंभीर, सरपंच प्रतीक शेळके,माजी नगरसेवक मदन आढाव,राम घाडगे,राम जरंगे, मिलिंद जपे, अभय शेंडगे, स्वप्नील दगडे, विलास तळेकर, अजित कर्णावट, संजय दुडगू, ओंकार येमूल, सोहम रामगिरी, अर्जुन दुडगू, गणेश शेराल, शिवराज धोत्रे,अजय काळे, लक्ष्मीकांत तिवारी, शंकर बोरुडे, ओंकार येमुलअजिंक्य मुळे, रुपम भागवत, निशांत बोराटे, अर्जुन दुडगु, वेदांत अडसूळ ,सिद्धांत अडसूळ

अभिषेक रायपेली आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कथेदरम्यान श्री गणेश व कार्तिकेय यांचे व्यासपीठावर आगमन होताच भाविकांनी भक्तिभावाने नामाचा जयघोष केला. या प्रसंगामुळे कथा स्थळावरील वातावरण अधिकच भक्तिमय झाले.